# कॉफी विथ सी.ई.ओ.

#CoffeewithCEO -    Program 11

कॉफी विथ सी.ई.ओ. हा कार्यक्रम मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या दालनात संपन्न झाला. प्रसंगी दिनांक- २६ जानेवारी २०१७ ला पालघर तालुक्यातील ODF जाहीर केलेल्या ३० ग्रामपंचायतीचे सरपंच उपस्थीत होते, सदर कार्यक्रमास मा. सभापती, आरोग्य व बांधकाम श्री. सुरेश तरे साहेब, मा. जिल्हा परिषद सदस्य, श्री. प्रकाश निकम साहेब, व मा. श्रीम. निता समिर पाटील आदि मान्यवर उपस्थित राहील्याने कार्यक्रमास शोभा आली. तसेच पालघर तालुक्याचे विस्तार अधिकारी श्री. उमतोल सर, ग्रामपंचायतीचे सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी मा..मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. निधी चौधरी यांनी कार्यक्रमाचे प्रयोजन सांगताना सकाळी झालेल्या मुख्य सचिवांच्या आढावा बैठकीमध्ये संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त करुन सरपंच व ग्रामपंचायत सदस्य गावाचा विकास करु शकतात. यामुळे गाव कुपोषण व आजारमुक्त होऊ शकते. तसेच त्यांनी उपस्थित सरपंचांचे २६ जानेवारी २०१७ ला ग्रामपंचायती ODF मुक्त केल्याने त्यांचे कौतुक केले.

मांडे ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.जयेश अनंत पाटील यांनी गावाच्या विकासाबाबत योजना बद्दल सांगताना बचत गटाच्या मार्फत उकीरडया/ घनकचररा यांपासून खत बनवले जाते.व ते खत ४.५० रु जवळच्या शेतकऱ्यांना विकले जाते.हया कामासाठी त्यांना सकाळचा अर्धा तास दयावा लागतो. तसेच सांताक्रुझ कॉलेजच्या N.S.S च्या विदयार्थ्यांच्या मदतीने शाळेतील इंग्रजी व गणिता मध्ये कच्चे असलेल्या मुलांना ते आठवडयातला १ दिवस देतात. माकणे येथे Open English केंद्र सुरु केले आहे.तसेच ग्राममंगल योजना जव्हार व बोईसर येथे सुरु केलेल्या आहेत.तसेच सावराई ग्रामपंचायतीतील ऋषी विज्ञान केंद्राच्या मदतीने उकीरडामुक्त गाव केला आहे.

या प्रसंगी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षकांची गुणवत्ता वाढण्यासाठी Digital शाळा सुरु करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच शाळेला परसबागेचे नियोजन करावे जेणे करुन शाळे भोवतीचे अतिक्रमण कमी होईल. १जुलै रोजी २ कोटी वृक्ष लागवड केली आहे त्यांचे संवर्धन करणे,तसेच या वर्षी १जुलै १५ जुलै २०१७ यादरम्यान ४ कोटी वृक्षाची लागवड करण्याचा माणस जाहीर केला.

गावातील विकासकामे व समस्या या विषयी चर्चा करण्यात आली.तसेच स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत उत्कृष्ट काम करणारे ग्रामपंचायतीतील सरपंच यांना पदके देवून

गौरवविण्यात आले. सर्व उपस्थितांशी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. निधी चौधरी यांनी मनमोकळा संवाद सकारात्मक चर्चा झाली. यावेळी स्वच्छ भारत मिशन ग्रामिण अंतर्गत चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. तसेच हिरवेबाजार येथिल पोपटराव पवारांचे उदाहरण देवून ग्रामविकासासाठी त्यांची कार्यशाळा ठेवण्याबद्दल सांगितले.

| अ.क्र. | ग्रा.प. चे नाव | सरपंचाचे नाव |
|---|---|---|
| १ | बहाडोली | सौ. सुजाता संतोष बरफ |
| २ | उच्छळी | श्री. रविंद्र पांडूरंग नाईक |
| ३ | चहाडे | श्रीम. रंजना दशरथ वाढाण |
| ४ | चिंचारे | श्री. चिंतामण राज्या गोरखाना |
| ५ | दहिसर तर्फे मनोर | श्री .सुनिल नथु दुबळा |
| ६ | दापोली | सौ. रुपेक्षा रमाकांत राऊत |
| ७ | धनसार | श्री. रविंद्र डाहया पाटील |
| ८ | गोवाडे | श्री. ईश्वर बरड |
| ९ | गांजे- ढेकाळे | सौ. दर्शना दामु पऱ्हाड |
| १० | घिवली | कु.प्रियंका सुरेश गायकवाड |
| ११ | जायशेत | कु.कविता विष्णू भोये |
| १२ | करळगांव | सौ. आशा वसंjत वायडा |
| १३ | लोवरे | सौ.कमा कुसुमाकर जाधव |
| १४ | मेंढवण | श्री. बिस्तूर शिडवा कुवरा |
| १५ | नेवाळै | श्रीम.गिता गणेश राऊत |
| १६ | पोचाडे | सौ. मानसी मुकेश गोवारी |
| १७ | पोळे | सौ. सुनिता संजय वावरे |
| १८ | रावते | श्रीम. वंदना प्रभाकर पुजांरा |
| १९ | शेलावली | श्री. शांताराम चिमा शिताड |
| २० | वाडा खडकोना | सौ. कांता हिरालाल गुरोडा |
| २१ | वेंगणी | सौ. कामिनी काशीनाथ हिलीम |
| २२ | मांडे | श्री. जयेश अनंत पाटील |